# महाराष्ट्र शासन

**महत्वाचे/अत्यंत तातडीचे पत्र/ई-मेल**

क्रमांक :- आतेवि-२०११/प्र.क्र.१४६/ नापु-२२
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०६.०९.२०११

प्रति,

१) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा (मो/शा), मुंबई,
२) संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई,
३) सर्व जिल्हाधिकारी,
४) सर्व उप आयुक्त (पुरवठा),
५) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
६) अन्नधान्य वितरण अधिकारी (पुणे, नागपूर आणि सोलापूर),

विषय :- सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत सवलतीच्या
दराने पामतेल वितरणाची योजना (सन २०११-१२)
संदर्भ :- शासन पत्र समक्रमांक दि.१६ जुलै, २०११

केंद्र शासनाने सवलतीच्या दराने पामतेल वितरीत करण्याच्या योजनेस माहे सप्टेंबर, २०११ पर्यंत मुदतवाढ दिली असून राज्याला ८७,७४० मे.टन पामतेलाचे नियतन मंजूर केले आहे. केंद्र शासनाने राज्यास मंजूर केलेले पामतेलाचे नियतन माहे जुलै, २०११ ते सप्टेंबर, २०११ या कालावधीत आयात करुन घेऊन माहे जुलै, २०११ ते माहे डिसेंबर, २०११ या कालावधीत लाभार्थ्यांना प्रति शिधापत्रिका दरमहा एक लिटर पामतेल रु.४५/- प्रति लिटर या दराने वितरीत करण्यास तसेच पामतेल वितरणाच्या योजनेचे काम यापूर्वीप्रमाणेच दी महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लिमी. या अभिकर्ता संस्थेकडून करुन घेण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

२. शासनाने मंजूरी दिल्यानुसार राज्यातील जिल्हानिहाय लाभार्थ्यांची संख्या विचारात घेऊन माहे जुलै, २०११ च्या पामतेलाचे जिल्हानिहाय नियतन आदेश उपरोक्त संदर्भित दि.१६ जुलै, २०११ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. केंद्र शासनाने राज्यास चार महिन्यांच्या कालावधीकरिता दरमहा १४,५०० मे.टन पामतेलाचे नियतन मंजूर केले असल्यामुळे माहे ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर, २०११ या महिन्यांचे जिल्हानिहाय नियतन माहे जुलै, २०११ च्या नियतनाएवढेच असेल. सर्व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांच्या जिल्ह्याची गोदाम निहाय मागणी मार्केटिंग फेडरेशनकडे तात्काळ पाठवावी व त्याची एक प्रत शासनास सादर करावी. तसेच नियंत्रक, शिधावाटप यांनाही कळविण्यात येते की त्यांनी आपल्या कार्यक्षेत्राची गोदाम निहाय डिलीव्हरी सेंटर निहाय मागणी मार्केटिंग फेडरेशनकडे पाठवावी.

( र.मु.मनाळे )
अपर सचिव
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत : माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
व्यवस्थापकीय संचालक, मार्केटिंग फेडरेशन, मुंबई.
कार्यासन नापु-२२ संग्रहार्थ.